ठाणेवैभव

10/06/2019

# प्रा.डॉ. मनिषा भिंगारदिवे आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**ठाणे, दि.९(वार्ताहर)-कॉमनवेल्थ व्होकेशनल विद्यापीठ आणि कॉमनवेल्थ सोसायटी फॉन इनोव्हेशन आणि रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने आयकॉनिक अॅवॉर्ड सोहळा २०१९ आणि वाणिज्य, व्यवस्थापन आणि समाजशास्त्र या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद, बँकॉक, थायलंड येथे भरवली होती. या परिषदेत शैक्षणिक क्षेत्रात मोलाची कामगिरी करणाऱ्या देशभरातील शिक्षकांना पुरस्कृत करण्यात आले.**

ही परिषद नामांकित विद्यापिठातील विद्वान डॉ. मोहम्मद फहीम (Thammasat University, Bangkok, Thailand), डॉ. वनिडा वदिवरोएन (Thai-Nichi Institute of Technology, Bangkok Thiland), डॉ. गेसीरी पंथुरा (The Association of Researchers, Thiland), डॉ. राताना क्लन्हेअब (Thai-Nichi Institute of Technology, Bangkok Thiland)



आणि इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत पार पडली. परिषदेत ठाणे येथील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील प्रा. डॉ. मनिषा कांबळे-भिंगारदिवे यांना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील यश आणि कामगिरी दखलपात्र आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरवण्यात आले.

मुंबई विद्यापीठाच्या वाणिज्य विषयाच्या पीएचडी संशोधन मार्गदर्शक असलेल्या डॉ. मनिषा कांबळे-भिंगारदिवे यांनी परिषदेत 'इंम्पॅक्ट मायक्रोफायनान्स ऑन इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कॉम्पॅरिटिव्ह स्टडी ऑफ इंडिया आणि बांगलादेश' या शोधनिबंधाचे वाचन केले. लघु, वित्त आणि महिला सक्षमीकरण हा त्यांचा पीएचडी संशोधनाचा विषय असून या अनुषंगाने त्यांनी मुंबई विद्यापिठाचा किरकोळ संशोधन प्रकल्पही पूर्ण केला आहे. त्याचबरोबर विविध ५८ आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय परिषदेत ४० शोधनिबंध सादर आणि प्रकाशित केलेले आहेत. त्यांच्या उपरोक्त विषयाच्या तीन शोधनिबंधांची उत्कृष्ट शोधनिबंध म्हणून निवड झाली आहे. तसेच त्यांना भारतीय शिक्षा रत्न पुरस्कार (२०१५) आणि आदर्श महिला पुरस्कार (२०१७) मिळाले आहेत.

विदेशातील आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंधाचे वाचन, आधुनिक अध्यापन शास्त्राची माहिती आणि शैक्षणिक विचारांची देवाण घेवाण याचा फायदा नक्कीच ज्ञानसाधना महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना होईल असे त्यांनी नमूद केले.

लोकसत्ता

11/07/2019



# ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची अभ्यास भेट

शामल भंडारे

**ठाण्यातील सतीश** प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अभ्यास भेटीचे आयोजन करण्यात आले होते. कनिष्ठ महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थ्यांनी मुंबई येथील विधानसभा आणि शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयास भेट दिली. या अभ्यास भेटीमध्ये विद्यार्थ्यांना विधान परिषदेचे कामकाज प्रत्यक्ष बघण्याची संधी मिळाली. विधानसभेचे काम कसे चालते आणि सदस्यसंख्या याविषयी प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वेळेस विद्यार्थ्यांनी मुंबई येथील शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयास भेट देताना तेथील ऐतिहासिक मूर्ती, चित्रे, वस्तू आणि दस्तऐवज यांचा अभ्यास करण्याची संधी मिळाली. या अभ्यास भेटीत प्राध्यापकांनी ऐतिहासिक गोष्टींचा उपयोग आणि त्याचा इतिहास याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. या अभ्यास भेटीत ४५ विद्यार्थी सहभागी झाले होते. या अभ्यास भेटीस सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मराठे, उपप्राचार्य स्वाती नाझर आणि कला शाखेचे प्रमुख सुनीता जमणे यांचे सहकार्य लाभले.

Date: 13/07/2019

महाराष्ट्र टाइम्स

# पहिल्याच फेरीत प्रवेश?

## अकरावी कटऑफ घसरला, प्रवेश समीकरण बदलणार

म. टा. प्रतिनिधी, ठाणे

दहावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांचा टक्का घसरला असताना तेच चित्र पुन्हा अकरावीच्या कटऑफ यादीतही दिसून आले आहे. ठाणे शहरातील बहुतांश सर्वच कॉलेजांच्या कटऑफमध्ये लक्षणीय घट झाल्याची बाब नोंदविण्यात आली आहे.

अकरावीची कटऑफ यादी शुक्रवारी सायंकाळी जाहीर झाली. यामध्ये शहरातील नामांकित कॉलेजांच्या कटऑफमध्ये अनपेक्षित घट झाली असल्याचे दिसते. यामध्ये बांदोडकर कॉलेजात गेल्यावर्षी ९३ टक्के कटऑफ असताना यंदा ८५.६६ टक्क्यांची नोंद झाली आहे. मो. ह. विद्यालय आणि कनिष्ठ कॉलेजात विज्ञान शाखेत गेल्या वर्षीच्या ९६ टक्क्यांमध्ये घट होवून यंदा ८९ टक्के तर वाणिज्य शाखेत ९४ टक्क्यांवरून थेट ८८ टक्क्यांवर घसरला आहे. कलाशाखेनेही यंदा अवघा ५५ टक्के कटऑफ नोंदविला आहे. ज्ञानसाधना कॉलेजात गेल्या वर्षी ८० टक्के असलेला विज्ञान शाखेचा निकाल यंदा ७५ टक्के नोंदविण्यात आला आहे. वाणिज्य शाखेत मात्र ६३ टक्क्यांवरून ७३ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. मात्र कला शाखेच्या कटऑफमध्येही पाच टक्क्यांनी घट झाल्याने ४५ टक्के नोंदविण्यात आले आहे. शुभमराजे कॉलेजात विज्ञान शाखेचा कटऑफ ९६.८७ टक्के तर वाणिज्य शाखेचा कटऑफ ८८ टक्के लागला आहे. सेंट जॉन बाप्टिश हायस्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये विज्ञान शाखेचा गेल्या वर्षी ८७ टक्के कटऑफ असताना यंदा ८१ टक्के तर वाणिज्य शाखेचा ८४ टक्के असलेला कटऑफ यंदा ७४ टक्क्यांवर नोंदविण्यात आला आहे.

> **कॉलेजांमध्ये विद्यार्थ्यांच्या क्षमतेतही वाढ झाली असून कटऑफही घसरला आहे. त्यामुळे कॉलेजांकडे पहिल्याच यादीत अपेक्षेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांची नावे आहेत.**
>
> **- प्रा. दिनेश जोशी, ज्ञानसाधना कॉलेज**

Date: 1/08/2019

लोकसत्ता




# ज्ञानसाधना महाविद्यालयात कारगिल विजय दिन

**ठाणे :** ठाणे येथील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्राध्यापक डॉ. राजीव गुप्ते यांनी विद्यार्थ्यांना कारगिल दिवसाचे महत्त्व सांगितले. भारतीय सीमा सुरक्षित राहाव्यात याकरिता भारतीय सैन्य डोळ्यात तेल घालून रक्षण करतात. याचबरोबर चीनची रणनीती, हिंदी महासागरातील इतर देशांचे वाढते प्राबल्य आणि देशासमोरील आव्हाने या विषयी राजीव गुप्ते यांनी माहिती सांगितली. देशाने केलेले सुरक्षा व्यवस्थेचे उपाय आणि परराष्ट्रीय धोरण याचे महत्त्वही त्यांनी विशद केले. या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख लेफ्टनंट दिलीप आसावे, राधिका चिरीवेल्ली आणि सिग्नल शाळेचे विद्यार्थी उपस्थित होते.

ठाणेवैभव

14/08/2019

# 'ज्ञानसाधना' तर्फे पूरग्रस्तांना ५२०० किलो धान्य

## मुख्यमंत्री मदतनिधीला एक लाखाचा धनादेश

**ठाणे, दि. १३ (वार्ताहर) – सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय ठाणे परिवारातर्फे सांगली व कोल्हापूर येथील पूरग्रस्त लोकांकरिता एकूण ५२०० किलो धान्यांची मदत करण्यात आली.**

महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभाग शिक्षक, वरिष्ठ विभाग शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून ३६०० किलो, विश्वेश्वर महादेव मंदिर ठाणे यांच्याकडून १२०० किलो व गुर्जर भिशी मंडळ यांच्याकडून ४०० किलो असे एकूण ५२०० किलो धान्य जमा केले. एकूण १३०० पाकिटे जमा केली. यातसाखर १ किलो पाकिटे, तांदूळ १ किलो पाकिटे, गव्हाचे पीठ १ किलो पाकिटे, तूरडाळ ५०० ग्रॅम पाकिटे, बेसन पीठ ५०० ग्रॅम पाकिटे, याच्याव्यतिरिक्त २८०० सॅनिटरी नॅपकिन्स महिलांकरिता पुरविण्यात आले आहेत.

ज्ञानसाधना ठाणे संस्थेकडून सांगली व कोल्हापूर येथील पूरग्रस्त लोकांकरिता एक लाख एक हजाराचा धनादेश मुख्यमंत्री मदतनिधीसाठी देण्यात आला आहे.

लोकमत 23/08/2019

# ज्ञानसाधना महाविद्यालयाचा पूरग्रस्तांना मदतीचा हात

## जीवनावश्यक वस्तू : कोल्हापूरमध्ये वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : शारदा एज्युकेशन सोसायटी संचालित आनंद विश्व गुरु कुल महाविद्यालय, सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि नॅशनल कॅडेट कोरच्या विद्यार्थ्यांनी मु.पो. भेंडवडे, ता. हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथील पूरग्रस्तांना साहाय्य केले. या दुर्लक्षित गावातील ६५० कुटुंबीयांना तांदूळ, गव्हाचे पीठ, बेसन, तूरडाळ, तेल, साखर, चहा पावडर, बिस्किटे, झाडू, दंतमंजन, सॅनिटरी नॅपकीन यासारख्या जीवनावश्यक दोन ट्रक भरुन वस्तूंचे वाटप १६ ऑगस्टला स्थानिक आमदार डॉ. सुजित मिणचेकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. शारदा एज्युकेशन सोसायटीचे सचिव प्रा.डॉ. प्रदीप ढवळ व सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे सचिव कमलेश प्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली रा.से.यो.च्या स्वयंसेवकांनी ही जमा झालेली सामग्री एकत्रित करुन घरोघरी जाऊन त्याचे वितरण केले. या सामाजिक कार्याची सांगता स्वयंसेविकांनी ग्रामस्थांना राखी बांधून केली.




# आनंद विश्व गुरुकुल आणि सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाची पूरग्रस्तांना मद

मुंबई, दि. २५ - ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पूरग्रस्त महाराष्ट्रासाठी अविरत झटण्याच्या प्रेरणेने शारदा एज्युकेशन सोसायटी संचालित आनंद विश्व गुरुकुल महाविद्यालय आणि सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि नॅशनल कॅडेट कोरच्या विद्यार्थ्यांनी मु. पो. भेंडवडे, ता. हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथील पूरग्रस्तांना साहाय्य केले. असा उपक्रम राबवणारे आनंद विश्व गुरुकुल व सतीश प्रधान ज्ञानसाधना हे पहिले महाविद्यालय ठरले. या दुर्लक्षित गावातील ६५० कुटुंबियांना तांदूळ, गव्हाचे पीठ, बेसन, तूरडाळ, तेल, साखर, चहा पावडर, बिस्कीट, झाडू,



दंतमंजन, सॅनिटरी नॅपकिन यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

संबंधित वस्तूंसाठी महाविद्यालयातर्फे मदतीचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला यश म्हणून जवळपास दोन ट्रक सामग्री जमवण्यात आली. शारदा एज्युकेशन सोसायटीचे सचिव प्रा. डॉ. प्रदीप ढवळ व सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे सचिव कमलेश प्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली रा. से. यो. च्या स्वयंसेवकांनी ही जमा झालेली सामग्री एकत्रित करून घरोघरी जाऊन त्याचे वितरण केले. दिलेली मदत प्रत्येक व्यक्तीपर्यंत प्रत्यक्ष पोहोचावी हा या मागचा उद्देश होता. व्यवस्थापनाचे सदस्य, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी असे मिळून जवळपास ७२ लोक १५ ऑगस्टला ठाण्याहून भेंडवडे गावाकडे रवाना झाले. १६ ऑगस्टला स्थानिक आमदार डॉ. सुजित मिणचेकर, माजी आरोग्यमंत्री डॉ. संदीप सावंत, सरपंच काका पाटील, शारदा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विलास ठु सचिव प्रा. डॉ. प्रदीप ढव सतीश प्रधान ज्ञानसा महाविद्यालयाचे खजिन सतीश शेठ, आनंद विश्व गुरु जेष्ठ रात्र महाविद्यालया प्राचार्या डॉ. हर्षला लिखि आनंद विश्व गुरुकुल वि महाविद्यालयाचे प्राचार्य अ सुयश प्रधान, रा. से. यो प्रोग्राम ऑफिसर प्रा. सि बागवे, असिस्टंट प्रो ऑफिसर प्रा. मनोज व प्रा. संजय चौधरी, प्रा. प्रां ढवळ, शंकर कोकाटे उपस्थि होते. या सामाजिक कार्य सांगता स्वयंसेविकांनी ग्रामस राखी बांधून केली. अशाप्र पुन्हा एकदा आनंद विश्व गुरु व सतीश प्रधान ज्ञानस महाविद्यालयाने समाजसे आपले व्रत कायम राखले.

पुण्यनगरी 29 NOV 2019

# विधानभवनावर भगवा फडकल्याने ठाण्यात उत्साह

## ठाण्यातील ज्येष्ठ शिवसैनिकांना झाला आनंद

गणेश पारकर

ठाणे : राज्यात तब्बल २४वर्षांनी शिवसेनेचा मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या रूपाने विराजमान होतं आहे. यानिमित्ताने शिवसेनेला पहिल्यांदा सत्ता ज्या ठाणे शहरात मिळाली , जिथे पहिल्यांदा भगवा फडकला त्या ठाण्यात आज आनंदाच वातावरण आहे . किंबहुना ठाणे आणि ठाकरे हे वेगळं नातं आहे . शिवसेनेच्या जडणघडणीत ठाणे शहराचा सिंहाचा वाटा आहे . शिवसेनाप्रमुख प्रत्येक निवडणुकीत मुंबई आधी ठाण्यात प्रचारसभा घ्यायचे . त्या ठाण्यातील जुन्या शिवसैनिकांना उध्दव ठाकरे मुख्यमंत्री होतांना काय भावना आहेत हे दैनिक पुण्यनगरीने जाणून घेतले . यावेळी शिवसैनिकांनी उध्दव यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत काही जुन्या आठवणींना उजाळा दिला . शिवसेनेच्या स्थापनेनंतर वर्षभरात झालेल्या ठाणे नगरपरिषदेच्या निवडणुकीत शिवसेना विजयी झाली आणि पहिला नगराध्यक्ष म्हणून वसंत मराठे यांची निवड झाली . उद्धव ठाकरे यांची मुख्यमंत्री म्हणून निवड होत आहे याबाबत वसंत मराठे याची प्रतिक्रिया जाणून घेतली असता ते म्हणाले कि , ५३ वर्षांपूर्वी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या साथीने आम्ही जे रोपटे लावले होते . त्यांचा आज वटवृक्ष झाला हे पाहून मनापासून आनंद होत आहे .

त्याकाळी मराठी माणसाच्या हक्कासाठी शिवसेनेची स्थापना झाली होती. त्यावेळी ही संघटना वाढविण्यासाठी आमच्या बरोबर असंख्य शिवसेनिकांनी प्रचंड मेहनत घेतली होती. आज उद्धव ठाकरे यांच्या रूपाने पुन्हा शिवसेनेचा मुख्यमंत्री होत आहे हा ऐतिहासिक क्षण आहे . ते महाराष्ट्राला वेगळ्या उंचीवर घेऊन जातील असा विश्वास यावेळी मराठे यांनी व्यक्त केला. याबाबत शिवसेनेचे जेष्ठ नेते माजी खासदार ठाण्याचे प्रथम महापौर सतीश प्रधान याच्या भावना जाणून घेतल्या असता ते म्हणाले की , सर्वसामान्य शिवसेनीकानी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना जे वचन दिलं होतं ते आज पूर्ण झालं. मला प्रचंड आनंद झाला असून उद्धव ठाकरे यांच्या रूपाने एक नवीन नेतृत्व राज्याला लाभत आहे.

त्यांना सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नाची समस्यांची जाण आहे. त्यांचं निराकारण ते नक्की करतील असा विश्वास यावेळी प्रधान यांनी व्यक्त केला. आज माझ्यासमोर शिवसेनेच्या स्थापनेचा काळ डोळ्यासमोर आला असून एक संघटना आणि पक्ष जनमाणसात पोहचविण्याकरिता तेव्हा हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी प्रचंड मेहनत घेतली होती. तो प्रचंड संघर्षाचा काळ होता. त्याचा मी साक्षीदार आहे. माझ्यासारख्या ठाणे जिल्ह्यातील असंख्य शिवसैनिकांनी जीवाचं रान करून त्यावेळी



वसंत मराठे



सतीश प्रधान

पक्ष वाढवला . आज बाळासाहेब यांचा हा वारसा उद्धव ठाकरे पुढे नेत आहेत. एक मुख्यमंत्री म्हणून ते नक्कीच यशस्वी ठरतील त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत शिवसेनेला पुढे नेण्याचं काम मोठ्या जिकारीने केलं आहे . असं प्रधान यांनी यावेळी सांगितलं .

याबाबत बोलताना जेष्ठ शिवसैनिक प्रकाश गुप्ते म्हणाले , की शिवसेनाप्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी पुन्हा शिवसेनेची सत्ता आणण्याचं जे स्वप्न बघितलं होतं. ते उद्धव ठाकरे यांनी आज प्रत्यक्षात साकार केलं आहे. आमच्या सारख्या शिवसैनीकांनी ५३ वर्षांपूर्वी शिवसेना ही संघटना वाढवण्यासाठी जी मेहनत घेतली होती. ती आज सार्थकी लागल्याचं समाधान मिळालं.आज उद्धव



विलास सामंत



प्रकाश गुप्ते

ठाकरे हें त्यांच्या नेतृत्वगुणाने नवं महाराष्ट्र घडवतील असं गुप्ते यांनी सांगितलं. यानिमित्ताने शिवसेनेने ६७ साली जो ठाण्यात पहिला विजय मिळवला त्याच्या आठवणी डोळ्यासमोर येत आहे. ती पावसातील शिवसेनेची पहिली विजयी सभेच्या आठवणी आजही ताज्या झाल्याचे गुप्ते यांनी सांगितलं. महत्वाची बाब म्हणजे ठाकरे कुटुंब हे दिलेला शब्द पाळतात .ठाण्यात पहिली सत्ता मिळाल्यानंतर जेव्हा मी विजयी सभेत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना ठाणेकरांना एक नाट्यगृह आणि स्टेडियम देण्याबाबत चिठ्ठी पाठवली होती . तेव्हा क्षणाचाहि विलंब न करता ते देण्याचं त्यांनी जाहीर सभेत वचन दिलं . इतकंच नाही तर त्यांनी ते दादोजी कोंडदेव स्टेडियम आणि राम गणेश गडकरी रंगायतन च्या रूपात पूर्ण करून दाखवलं असं सांगत उध्दव ठाकरे यांनीही जे महाराष्ट्राच्या जनतेला जे आश्वासन दिलं आहे त्याची पूर्तता करतील असा विश्वास गुप्ते यांनी व्यक्त केला .

ठाणे महापालिकेची स्थापना झाल्यानंतर १९८६ पहिल्या साली शिवसेनेचे जे नगरसेवक निवडून आले होते त्यात विलास सामंत यांचाही समावेश होता . याबाबत बोलताना विलास सामंत म्हणाले कि , त्या पहिल्या महापालिका निवडणुकीच्या वेळी शिवसेनेचा उमेदवार निवडून येण्याकरीता सामान्य शिवसैनीकांनी जीवाचं रान केलं होतं. आज २४ वर्षांनी शिवसेनापक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी विधानसभेवर पुनश्च भगवा फडकवून बाळासाहेबांचं स्वप्न पूर्ण केलं याचा सार्थ अभिमान असल्याचं सामंत यांनी सांगितलं.

ठाणे वैभव
९/१२/२०१९

# ठाण्यात रंगणार वक्तृत्वमैफल

ठाणे, दि.८ (वार्ताहर)- दरवर्षीप्रमाणे यंदाही ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात कै.ग.का.फणसे व कै.इंदिराबाई फणसे स्मृती चषक कोकण विभागीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा ११ डिसेंबर,२०१९ रोजी आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेचे यंदाचे हे १७ वे वर्ष आहे. सदर स्पर्धेत मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, पालघर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयांतील २ वरिष्ठ महाविद्यालयांतील २ विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र व भेटवस्तू प्रदान करण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त विजेत्यांना चषक, रोख रक्कम देऊन गौरविण्यात येईल. भाषेचे माध्यम मराठी असून वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयातील प्रत्येक स्पर्धकासाठी प्रवेश फी अनुक्रमे १०० रू. आणि ५० रू. असणार आहे.

कनिष्ठ महाविद्यालयीन गटासाठी स्पर्धेचे विषय: १-राजकारणात अडकलेले शेतकरी, २-सशक्त लोकशाहीतील विरोधी पक्षाचे महत्त्व, ३-सार्वजनिक दळणवळण व्यवस्था आणि सद्यस्थिती, ४-विज्ञान क्षेत्रातील स्त्रीचा सहभाग, ५-शाहीर अण्णाभाऊ साठे-एक झंझावात, ६-गरज आर्थिक साक्षरतेची आहेत तर वरिष्ठ महाविद्यालयीन गटासाठी स्पर्धेचे विषय: १-चित्रपट / मालिकांमधून होणारे इतिहासाचे पानिपत, २-राजकारणाचे बदलते स्वरूप, ३-पाणी अडवा पाणी जिरवा, ४-कलम ३७० आणि लोकशाही ५-पायाभूत सुविधांसाठी होणारी वृक्षतोड योग्य की अयोग्य? हे आहेत. अधिक माहितीसाठी वरिष्ठ महाविद्यालय-डॉ. प्रज्ञा पवार-९८६९४८०१४१ प्रा.सुरेश खुणे-९७६९९४८४७१(पेटीएम), कनिष्ठ महाविद्यालय-प्रा.इशिता सेनगुप्ता-७७३८०५२०७२ प्रा.मनीषा राजपूत-९८६९२४८६७४, प्रा.महेश कुलसंगे-९०११२७८४८८(पेटीएम) यांच्याशी संपर्क साधावा.

९ डिसेंबर २०१९ लोकसत्ता

## विभागीय अंतिम फेरीसाठी चार महाविद्यालयांची निवड

# वैविध्यपूर्ण एकांकिकांनी ठाण्याच्या प्राथमिक फेरीत रंगत

प्रतिनिधी, ठाणे

दीपक जोशी



वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या 'सुलू' या एकांकिकेतील हा प्रसंग.

**स्वत:मधील सर्जनशीलतेला** रंगभूमीची जोड देऊन वैविध्यपूर्ण एकांकिका सादर करण्याचा प्रयत्न ठाणे विभागातील विविध महाविद्यालयांच्या कलाकारांनी 'लोकसत्ता लोकांकिका'च्या मंचावरून केला. शनिवारी या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचा पहिला टप्पा झाल्यानंतर दुसरा टप्पा रविवारी मोठ्या उत्साहात पार पडला.

'लोकसत्ता लोकांकिका' या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन मराठी एकांकिका स्पर्धेच्या ठाणे विभागातील दोन टप्प्यांत भाग घेतलेल्या महाविद्यालयांपैकी उल्हासनगर येथील एस.एस.टी. महाविद्यालयाची 'हित्यास भूगोल', डोंबिवली येथील मॉडेल महाविद्यालयाची 'सतराशे साठ दलिंदर', ठाणे येथील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाची 'भोकरवाडीचा शड्डू' आणि उरण येथील कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयाची 'हमीनस्तू' या चार एकांकिका ठाणे विभागीय अंतिम फेरीसाठी निवडण्यात आल्या आहेत. ठाणे विभागात अव्वल ठरलेल्या चार एकांकिकेतील चुरस गुरुवार, १२ डिसेंबर रोजी ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे दुपारी ३ वाजल्यापासून रंगणार आहे.

ठाण्यात प्राथमिक फेरीच्या दुसऱ्या टप्प्यात वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाने स्मशानभूमीत राहणाऱ्या एका कुटुंबातील पती-पत्नीच्या आयुष्यावर भाष्य करणारी 'सुलू' ही एकांकिका सादर केली. माणुसकी आणि पैसा यांमधील फरक स्पष्ट करणारी 'तुला देतो पैसा' ही एकांकिका उरण येथील वीर वाजेकर महाविद्यालयाने सादर केली. बेस्ट कामगारांचा संप आणि घरात ढेकणांचा प्रादुर्भाव झाल्यामुळे खालावलेल्या आर्थिक परिस्थितीसंदर्भात भाष्य करणारी 'सतराशे साठ दलिंदर' ही एकांकिका डोंबिवली येथील मॉडेल महाविद्यालयाने सादर केली.

ठाण्यातील ज्ञानसाधना महाविद्यालयाने स्त्रीशोषण आणि त्याविरुद्ध लढा देणाऱ्या खेडेगावातील स्त्रीचे अस्तित्व 'भोकरवाडीचा शड्डू' या एकांकिकेतून परीक्षकांसमोर मांडले. काश्मीर प्रश्नावर भाष्य करणारी 'हमीनस्तू' ही एकांकिका उरण येथील कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयाने सादर केली.

कोपरखैरणे येथील लोकमान्य टिळक अभियांत्रिकी महाविद्यालयाने समलैंगिक संबंधावर भाष्य करणारी 'सोपं बट अनएक्सपेक्टेड' ही एकांकिका सादर केली. दुष्काळ आणि त्यातील एक प्रेमकथा दर्शवणारी 'हिरवळ' ही एकांकिका भाईंदर येथील शंकर नारायण महाविद्यालयाने सादर केली.

उल्हासनगर येथील सीएचएम महाविद्यालयाने विद्यार्थी निवडणुकांवर भाष्य करणारी 'वि द स्टुडन्ट ऑफ इंडिया' ही एकांकिका सादर केली. ज्ञानसाधना विद्यानिकेतन शाळेत पार पडलेल्या ठाणे विभागीय प्राथमिक फेरीचे परीक्षण सुप्रसिद्ध लेखक आणि दिग्दर्शक गणेश पंडित आणि लेखक निळकंठ कदम यांनी केले. या वेळी 'आयरिस प्रॉडक्शन'च्या सुवर्णा रसिक राणे यादेखील उपस्थित होत्या.

### विभागीय अंतिम फेरी गुरुवारी

'लोकसत्ता लोकांकिका' या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन मराठी एकांकिका स्पर्धेची ठाणे विभागीय अंतिम फेरी गुरुवार, १२ डिसेंबर रोजी ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे होणार असून या कार्यक्रमासाठीच्या प्रवेशिका गडकरी रंगायतन येथे कार्यक्रम सुरू होण्याच्या वीस मिनिटे आधी उपलब्ध होतील.



ही स्पर्धा युवकांना सद्य:स्थितीवर विचार करायला भाग पाडते. लोकांकिकामध्ये परीक्षक म्हणून काम करण्याचा एक वेगळाच अनुभव मिळाला.

- गणेश पंडित, परीक्षक



अतिशय उत्तम आयोजनामुळे लोकसत्ता लोकांकिका स्पर्धेला तरुणांचा उत्तम प्रतिसाद मिळत असतो. यंदाच्या एकांकिकांद्वारे विद्यार्थ्यांनी विषयांवर मार्मिक भाष्य केले आहे.

- निळकंठ कदम, परीक्षक



पूर्वी ठाणे विभागीय प्राथमिक फेरी ही एका दिवसात पार पडायची; आता स्पर्धेला प्रतिसाद वाढला आहे. विषयांतील वैविध्य लक्षणीय आहे.

- सुवर्णा रसिक राणे, परीक्षक



दरवर्षी या स्पर्धेतून नवनवीन गोष्टी शिकण्यास आणि अनुभवण्यास मिळतात. ठाणे विभागीय अंति[...] फेरीसाठी जोरदार तयार कर[...]

- निकिता धाग, ज्ञान[...] महाविद्याल[...]



'लोकसत्ता लोकांकिका' ही मानाची स्पर्धा आहे. आपली कला सादर करण्यासाठी हे खूप मोठे व्यासपीठ आहे.

- गौरव सरफरे, कोकण ज्ञ[...] महाविद्याल[...]



या स्पर्धेत एकांकिका सादर करण्याचे पहिलेच वर्ष होते. खूप शिकायला मि[...]

- करिश्मा संकपाळ, [...] भाऊराव पाटील महावि[...]

लोकसत्ता
०९/१२/२०१९

लोकसत्ता

11/12/2019

# व्याख्यानमाला, सांस्कृतिक महोत्सवांचा हंगाम सुरू

## ठाणे, कल्याण, डोंबिवलीत विविध कार्यक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी, ठाणे

**वाढत्या नागरीकरणातही** 'सांस्कृतिक नगरी' ही आपली ओळख टिकवून ठेवणाऱ्या ठाणे आणि डोंबिवली या शहरांमधील नागरिकांना मनोरंजनासोबत बौद्धिक खुराक मिळणार आहे. येत्या काही दिवसांत या शहरांत विविध ठिकाणी व्याख्यानमाला, संगीत महोत्सव, शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. साधारणतः डिसेंबर ते जानेवारी या कालावधीत पार पडणाऱ्या या कार्यक्रमांची नागरिक आतुरतेने वाट पाहत असतात. तो हंगाम आता सुरू झाला आहे.

### कार्यक्रमांची मांदियाळी

#### स. वि. कुलकर्णी व्याख्यानमाला

ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत गुरुवर्य स. वि. कुलकर्णी या व्याख्यानमालेचे दरवर्षी आयोजन करण्यात येते. यंदा या व्याख्यानमालेचे २५वे वर्ष आहे. या वर्षीच्या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प हे १३ डिसेंबर रोजी शास्त्रज्ञ सुहास नाईक साटम हे 'चांद्रयान-२' या विषयावर गुंफणार आहेत. तर, १४ डिसेंबर रोजी गौरी सावंत हे 'मला काही सांगायचं आहे' या विषयावर दुसरे पुष्प गुंफणार आहेत.

#### 'आयपीएच'चा माइंडफेस्ट

आयपीएचतर्फे 'माइंडफेस्ट' या तीन दिवसीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. 'माझ्या जगण्याचं नेमकं काय करायचं अर्थात वेदान्तविचार आणि व्यक्तिमत्त्व विकास' या संकल्पनेवर आधारित हा महोत्सव १३, १४ आणि १५ डिसेंबर या कालावधीत ठाण्यातील गडकरी रंगायतन समोरील समर्थ सेवक मंडळाच्या पटांगणात पार पडणार आहे.

#### पक्षीमित्र संमेलन

विद्यार्थ्यांना ठाण्याच्या खाडी किनाऱ्यावर किंवा राष्ट्रीय उद्यान परिसरात असणारे पक्षी यांची माहिती मिळावी, या उद्देशाने जिज्ञासा ट्रस्ट, पर्यावरण दक्षता मंडळ, होप, फर्न आणि यूबीजीसी यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी पक्षीमित्र संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे संमेलन २[illegible] डिसेंबर, रोजी सकाळी ७.३० वाजता मो. ह. विद्यालय, ठाणे येथे होणार आहे.

#### देवगंधर्व महोत्सव

कल्याण गायन समाजातर्फे आयोजित करण्यात येणारा देवगंधर्व महोत्सव यंदा १३, १४ आणि १५ डिसेंबर या कालावधीत आचार्य अत्रे रंगमंदिर येथे रंगणार आहे. या महोत्सवात सतारवादक पूर्बायन चॅटर्जी, शास्त्रीय गायक पं. कैवल्यकुमार, तबलावादक पं. योगेश सम्सी, पं. रघुनंदन पणशीकर अशी नामवंत मंडळी कला सादर करणार आहेत.

# विभागीय अंतिम फेरीसाठी शेवटची तालीम

**(पान १ वरून)** विभागीय अंतिम फेरीसाठी निवडण्यात आली आहे. 'प्राथमिक फेरीसाठी केवळ सहाच तास तालीम करत होतो, मात्र, ठाणे विभागीय अंतिम फेरीसाठी निवड झाल्यांनतर सलग बारा तास तालीम करत आहोत,' असे या एकांकिकेतील आकाश सुर्वे म्हणाला. उरण येथील कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयाच्या 'हमीनस्तू' या एकांकिकेची निवडही विभागीय अंतिम फेरीसाठी झाली असून स्पर्धेच्या विभागीय अंतिम फेरीत स्वतःला सिद्ध करण्यासाठी कलाकारांपासून ते नेपथ्य करणाऱ्यांपर्यंत सर्वच जण वेगाने कामाला लागल्याचे या एकांकिकेतील कलाकार सिद्धेश मोरे याने सांगितले.

डोंबिवली येथील मॉडेल महाविद्यालयाची 'सतराशे साठ दलिंदर' ही एकांकिका विभागीय अंतिम फेरीसाठी निवडण्यात आली आहे. ठाणे विभागीय अंतिम फेरीत प्रथम क्रमांक पटकावण्यासाठी समूहाची जोरदार तयारी सुरू असून नेपथ्यापासून ते अगदी वेशभूषेपर्यंत सर्वच गोष्टींकडे काळजीपूर्वक लक्ष दिले जात असल्याचे या एकांकिकेचा मार्गदर्शक किरण माने याने सांगितले. एकांकिकेच्या तालमीची वेळही वाढवण्यात आली आहे. सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत एकांकिकेचा सराव सुरू आहे. विशेष म्हणजे, सरावाच्या वेळेस एकांकिकेतील कलाकारांचे पालकदेखील उपस्थिती दर्शवत आहेत. त्यामुळे पालक आणि शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे सहकार्य मिळत असल्याचेही किरण माने याने सांगितले.

पुढारी 11 JAN 2020

# ग्रंथप्रदर्शनातून उलगडला जुने ठाणे ते स्मार्ट ठाण्याचा प्रवास

ठाणे : शहर वार्ताहर

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातर्फे ७ जानेवारी ते ९ जानेवारी दरम्यान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात वार्षिक ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यंदाचे प्रदर्शनाचे हे १९ वर्ष असून ठाणे शहराचा स्मार्ट सिटीपर्यंतचा प्रवास या संकल्पनेवर आधारित माझे ठाणे, प्रिय ठाणे या शीर्षकाखाली ग्रंथालयाला भेट देणाऱ्या ठाणेकरांनी ठाणे शहराचा स्मार्ट सिटीपर्यंतचा प्रवास अनुभवला.

तलावांचे शहर अशी ओळख असणाऱ्या ठाणे शहराला ऐतिहासिक, सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. या शहराची संपूर्ण ओळख महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आणि ठाणेकरांना व्हावी या हेतूने यंदा माझे ठाणे, प्रिय ठाणे या शीर्षकाखाली महाविद्यालयातील कै. राम देवळे ग्रंथालयात जवळपास तीन हजार पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले. या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन पत्रकार श्रीकांत नेर्लेकर यांच्याहस्ते करण्यात आले. या ग्रंथप्रदर्शनात शहराचा इतिहास सांगणारी पुस्तके, मराठी वाङ्मय, इंग्रजी साहित्य, इतिहास, मराठी संस्कृती, ठाण्यातील ऐतिहासिक ठिकाणे, विज्ञानाशी संबंधित पुस्तके, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची विषयांशी संबंधित पुस्तकांचा समावेश आहे.

शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, साने गुरुजी, विनोबा भावेंपासून ते गोपाळ गणेश आगरकर, बहिणाबाई चौधरी अशा नेते, कवयित्रींच्या जीवनचरित्रांचे भा. ल. भोळे, किशोर गायकवाड, सदानंद मोरे, चैत्रा रेडकर या लेखकांनी केलेल्या लेखनाच्या प्रतीही या ग्रंथप्रदर्शनात मांडण्यात आल्या. ठाणे शहराचा ग्रामीणपासून स्मार्ट शहरापर्यंतचा प्रवासमॉडेलच्यामाध्यमातूनठाणेकरांसमोर उलगडण्यात आला. या तीन दिवसीय ग्रंथ प्रदर्शनाला विद्यार्थी, ठाणेकर वाचकांनी दिलेला प्रतिसाद पाहता आणखीन एक दिवस हे प्रदर्शन वाचकांसाठी खुले ठेवण्यात येणार असल्याची माहिती ग्रंथपाल महेश दळवी यांनी दिली.



**ठाण्यातील जुनी ग्रंथालये, नाट्यगृह, ऐतिहासिक ठिकाणे, मंदिरे, जुनी वृत्तपत्रे या सगळ्यांबद्दलचा माहितीपट विद्यार्थी आणि वाचकांसाठी सादर करण्यात आला आहे. भारतीय संविधानाची मूळ प्रत विद्यार्थी आणि वाचकांना पाहायला मिळावी यासाठी या प्रतेचाही समावेश या ग्रंथ प्रदर्शनात समावेश करण्यात आल्याचे दळवी यांनी सांगितले.**

लोकसत्ता

12 DEC 2019

# वैविध्यपूर्ण विषयांवरील एकांकिकांच्या सादरीकरणाची उत्कंठा

## ‘लोकसत्ता लोकांकिका’ स्पर्धेची ठाणे विभागीय अंतिम फेरी आज; ठाण्याची ‘लोकांकिका’ ठरण्यासाठी चार महाविद्यालयांत चुरस

**लोकसत्ता ठाणे**

**दर्जेदार संवाद,** उत्कृष्ट अभिनय आणि लक्ष्यवेधी नेपथ्य यांची सांगड घालून ‘लोकसत्ता लोकांकिका’ स्पर्धेच्या ठाणे विभागीय अंतिम फेरीत स्वतःला सिद्ध करण्यासाठी प्राथमिक फेरीतून निवडण्यात आलेल्या महाविद्यालयांचे चमू सज्ज झाले आहेत. आज, गुरुवार १२ डिसेंबर रोजी ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे या चार महाविद्यालयांमध्ये चुरस रंगणार आहे. ठाणे विभागीय अंतिम फेरीत सादर होणाऱ्या या एकांकिका विविध सामाजिक आशयांनी युक्त असून प्रेक्षकांच्या मनोरंजनासोबत प्रबोधनात्मकही ठरणार आहेत.

महाविद्यालयीन जगतात नाट्यप्रेमी तरुणाई आतुरतेने ज्या स्पर्धेची वाट पाहत असते त्या ‘लोकसत्ता लोकांकिका’ स्पर्धेची ठाणे विभागीय अंतिम फेरी आज, गुरुवार १२ डिसेंबर रोजी ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे दुपारी ३ वाजल्यापासून रंगणार आहे. या फेरीसाठी निवडण्यात आलेल्या एकांकिकेतील विद्यार्थीही उत्तम सादरीकरणासाठी सज्ज झालेले आहेत. अंतिम टप्प्यात अभिनय, संवाद, वेशभूषा आणि नेपथ्य या सर्व गोष्टींकडे लक्ष दिले जात असतानाच दुसरीकडे एकांकिकेच्या मूळ विषयाचे गांभीर्य हरवता कामा नये यासाठी एकांकिकेच्या विषय सादरीकरणाची देखील विशेष काळजी घेतली जात असल्याचे कलाकार सांगत आहेत.

सॉफ्ट कॉर्नर ®
स्वप्न मनामनातलं । निर्माण्याच्या सान्निध्यातलं ॥
presents
लोकसत्ता लोकांकिका
in association with
मे. बी. जी. चितळे ® चितळे डेअरी
ZEE टॉकीज

ठाणे येथील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाची ‘भोकरवाडीचा शड्डू’ ही एकांकिका विभागीय अंतिम फेरीसाठी निवडण्यात आली आहे. या एकांकिकेचा विषय द. मा. मिरासदार यांच्या ‘हसणावळ’ या पुस्तकातील ‘कोणाचा कोण’ या कथेवर आधारित असल्याचे या एकांकिकेचा दिग्दर्शक अजय पाटील याने सांगितले. सध्या समाजात महिलांवर अत्याचार होत आहेत, महिलांचे शोषण केले जात आहे, यावर आळा बसावा यासाठी या एकांकिकेतील द्रौपदी कशाप्रकारे पुरुषांशी लढा देते याचे चित्र या एकांकिकेत प्रेक्षकांना पाहायला मिळणार असल्याचेही अजयने सांगितले.

**प्रायोजक**

**‘सॉफ्ट कॉर्नर’ प्रस्तुत, ‘लोकसत्ता लोकांकिका २०१९’ या स्पर्धेचे ‘मे. बी.जी. चितळे डेअरी’ आणि ‘झी टॉकिज’ हे सहप्रायोजक आहेत. तर, ‘इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड’, ‘कमांडर वॉटरटेक प्रायव्हेट लिमिटेड’ आणि ‘एम. के. घारे ज्वेलर्स’ हे पावर्डबाय पार्टनर आहेत. तसेच, ‘रणथंबोर सफारी’ आणि ‘ईशा नेत्रालय’ हे या स्पर्धेचे रिजनल पार्टनर आहेत. लोकसत्ता लोकांकिकेच्या कलाकारांना चित्रपट-मालिकेत संधी देणारे ‘आयरिस प्रॉडक्शन’ हे टॅलेंट पार्टनर असून ‘अस्तित्व’च्या सहकार्याने ही स्पर्धा पार पडत आहे.**

उरण येथील कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयाची ‘हमीनस्तू’ ही एकांकिका विभागीय अंतिम फेरीसाठी निवडण्यात आली आहे. ही एकांकिका काश्मीर प्रश्नावर भाष्य करणारी आहे. काश्मीरमधील नागरिक सध्या जी परिस्थिती अनुभवत आहेत त्यावर ही एकांकिका भाष्य करते, असे एकांकिकेतील कलाकार गौरव सरफरे याने सांगितले.

डोंबिवली येथील मॉडेल महाविद्यालयाची ‘सतराशे साठ दलिंदर’ ही एकांकिका विभागीय अंतिम फेरीसाठी निवडण्यात आली आहे. बेस्ट कर्मचाऱ्यांच्या समस्यांवर सध्या कोणी भाष्य करताना दिसून येत नाही. एका बेस्ट कर्मचाऱ्याची आर्थिक परिस्थिती या एकांकिकेच्या माध्यमातून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे, असे एकांकिकेची दिग्दर्शक शिवाली चौधरी हिने सांगितले.

उल्हासनगर येथील एसएसटी महाविद्यालयाची ‘हित्यास भूगोल’ ही एकांकिका विभागीय अंतिम फेरीसाठी निवडण्यात आली आहे. जागतिकीकरणाकडे जात असताना आज आपण आपल्या गावांचा, ग्रामीण भागांचा इतिहास विसरलेलो आहोत. याच इतिहासाचा शोध घेणारी ‘हित्यास भूगोल’ ही एकांकिका आहे. असे या एकांकिकेचा दिग्दर्शक राहुल शिरसाठ याने सांगितले.

लोकसत्ता

12 DEC 2019

चार महाविद्यालयांमध्ये चुरस

# ठाणे विभागाची आज अंतिम फेरी

प्रतिनिधी, ठाणे

'**लोकसत्ता लोकांकिका**' या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेची ठाणे विभागीय अंतिम फेरी आज, गुरुवार, १२ डिसेंबर रोजी ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे रंगणार आहे. प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या चार महाविद्यालयांमध्ये या वेळी चुरशीचा सामना होणार असून यामधून एका महाविद्यालयाची निवड महाअंतिम फेरीसाठी होणार आहे.

ठाणे केंद्रावर ७ आणि ८ डिसेंबर रोजी विभागीय प्राथमिक फेरी पार पडली. या फेरीला विविध महाविद्यालयीन एकांकिका समूहांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या चार महाविद्यालयांमध्ये आज, ठाण्यातील गडकरी रंगायतन येथील रंगमंचावर विभागीय अंतिम फेरीचा सामना रंगणार आहे.

**कधी ?**

आज दुपारी ३ वाजेपासून

**कुठे ?**

राम गणेश गडकरी रंगायतन, ठाणे

प्रवेश विनामूल्य, काही जागा निमंत्रितांसाठी.

**स्पर्धक संघ...**

ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाची 'भोकरवाडीचा शड्डू', डोंबिवली येथील मॉडेल महाविद्यालयाची 'सतराशे साठ दलिंदर', उल्हासनगर येथील एसएसटी महाविद्यालयाची 'हित्यास भूगोल' आणि उरण येथील कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयाची 'हमीनस्तू' या चार एकांकिकांमध्ये कोण विजयी ठरते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



भावनापूर्ण संवादाला दर्जेदार अभिनयाची जोड देत उत्कृष्ट नेपथ्य आणि दिग्दर्शनाशी सांगड घालत ही चार महाविद्यालये रंगतदार लढत देऊन राज्यस्तरीय महाअंतिम फेरीत प्रवेश मिळवण्यासाठी सज्ज झालेली आहेत. सामाजिक विषयांची वैविध्यता आणि तितक्याच मनोरंजनात्मक ठरणाऱ्या या एकांकिका पाहण्याची संधी प्रेक्षकांना गडकरी रंगायतन येथे दुपारी तीन वाजेपासून मिळणार आहे. या कार्यक्रमासाठीच्या प्रवेशिका गडकरी रंगायतन येथे कार्यक्रम सुरू होण्याच्या २० मिनिटे अगोदर उपलब्ध असणार आहेत.

13 DEC 2019

# ठाण्यातून 'हमीनस्तू' महाअंतिम फेरीत

प्रतिनिधी, ठाणे



**नेपथ्य, संहिता,** प्रकाशयोजना, रंगभूषा आणि वेशभूषा या सर्वांचा मेळ साधत सरस अभिनय करत आशययुक्त एकांकिकांनी 'लोकसत्ता लोकांकिका २०१९'ची ठाणे विभागीय अंतिम फेरी गुरुवारी गडकरी रंगायतन येथे जल्लोषात पार पडली. ठाणे विभागातून उरण येथील कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयाच्या 'हमीनस्तू' या एकांकिकेने राज्यस्तरीय महाअंतिम फेरीत प्रवेश केला.

ठाणे विभागीय अंतिम फेरीत चार महाविद्यालयांमध्ये चुरशीची लढत रंगली. वैविध्यपूर्ण विषयांनीयुक्त दर्जेदार कलाकृतींचे सादरीकरण ठाणे विभागीय अंतिम फेरीत पाहायला मिळाले. 'गर फिरदौस बर रूये जमी अस्त्, हमीनस्तू हमीनस्तू हमीनस्तू' धरतीवरील स्वर्ग कुठे आहे तर काश्मीर आहे असे काश्मीर खोऱ्यातील सध्याची धार्मिक, राजकीय वादाची परिस्थिती आणि एक प्रेमकथा यावर भाष्य करणारी 'हमीनस्तू' ही एकांकिका राज्यस्तरीय महाअंतिम फेरीत ठाणे विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे. याव्यतिरिक्त ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाने 'भोकरवाडीचा शड्डू' तर 'हित्यास भूगोल' ही एकांकिका उल्हासनगर येथील एसएसटी महाविद्यालयाने



## पारितोषिके...

**सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक :** निखिल पालांडे आणि गौरव रेळेकर (हमीनस्तू, कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय, उरण)

**सर्वोत्कृष्ट लेखक :** प्राजक्त देशमुख (हमीनस्तू, कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय, उरण)

**सर्वोत्कृष्ट अभिनय :** आकाश सुर्वे (हित्या भूगोल, एसएसटी महाविद्यालय, उल्हासनग

**सर्वोत्कृष्ट नेपथ्यकार :** सचिन गोताड (सतराशे साठ दलिंदर, मॉडेल महाविद्यालय डोंबिवली)

**सर्वोत्कृष्ट संगीत :** ओंकार, राहुल आणि (हित्यास भूगोल, एसएसटी महाविद्यालय, उल्हासनगर)

## परीक्षक म्हणतात...



स्पर्धेमध्ये महाविद्यालयीन तरुणांनी उत्तम सादरीकरण केले. महाविद्यालयीन तरुणांमध्ये अभिनय करताना प्रचंड ऊर्जा दिसून आली. या तरुणांमधून उत्तम कलाकार घडवण्यासाठी लेखक आणि दिग्दर्शकांनी त्यांना अधिक चांगले मार्गदर्शन करायला हवे.

- प्रियदर्शन जाधव, अभिनेता, लेखक आणि दिग्दर्शक



ही स्पर्धा तरुणांमध्ये मानाची समजली जाते. यासारख्या स्पर्धांमुळे उत्तम कलाकार घडतात. तसेच यासारख्या स्पर्धांमुळेच मराठी नाटकांची उणीव भरून निघण्यास मदत होईल. त्यामुळे लोकसत्ता लोकांकिका स्पर्धा महत्त्वाची ठरते.

- अरविंद औंधे, लेखक आणि दिग्दर्शक

## विद्यार्थी म्हणतात-



यापूर्वी अनेक एकांकिका स्पर्धांमध्ये सहभागी झालो आहोत. मात्र, लोकसत्ता लोकांकिका या स्पर्धेत मला माझे पहिले अभिनयाचे पारितोषिक मिळाले, याचा प्रचंड आनंद होत आहे. 'हित्यास भूगोल' या एकांकिकेत नाना हे मुख्य पात्र साकारताना अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या.

-आकाश सुर्वे, सर्वोत्कृष्ट अभिनेता, एसएसटी महाविद्यालय, उल्हासनगर



ही स्पर्धा राज्याच्या आठ केंद्रांवर घेतली जाते. त्यामुळे या स्पर्धेत अधिक चुरस पाहायला मिळते. या स्पर्धेच्या ठाणे विभागीय अंतिम फेरीत उत्कृष्ट लेखकाचे पारितोषिक मिळाल्याने खूप आनंद होत आहे.

- प्राजक्त देशमुख, सर्वोत्कृष्ट लेखक, कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय, उरण

एखाद्या स्पर्धेच्या मागे माध्यम उभे राहते तेव्हा स्पर्धा ही उत्तम



होते आणि स्पर्धकांनाही उत्तम व्यासपीठ मिळते. त्यामुळे अशा स्पर्धांना सहकार्य करणे गरजेचे असते. लोकसत्ता लोकांकिका या मानाच्या समजल्या जाणाऱ्या स्पर्धेला मुख्य प्रायोजक म्हणून सहकार्य करण्याचा आनंद आहे. ठाणे विभागीय लोकांकिका स्पर्धेत वेगवेगळे विषय पाहायला मिळाले. सर्वच स्पर्धकांनी उत्तम सादरीकरण केले.

- दिलीप कुलकर्णी, सॉफ्ट कॉर्नर

Date : 14/12/2019

सकाळ » TODAY

## » ठाणे डायरी

### कार्यक्रम

- **माय ठाणे शॉर्ट फिल्म फेस्टिव्हल :** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय प्रांगण, वेळ : सकाळी ११
- **मला काही सांगायचं आहे** – गौरी सावंत यांचे व्याख्यान : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय प्रांगण, वेळ : सायंकाळी ५.३०.

# 'माय ठाणे' शॉर्ट फिल्म फेस्टिव्हल

**सकाळ वृत्तसेवा**

ठाणे, ता. १३ : ब्ल्यु एंटरटेनमेंट व सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय यांच्यावतीने 'माय ठाणे' शॉर्ट फिल्म फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. १४ व १५ डिसेंबरला सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय येथे हा महोत्सव होणार आहे. यंदाच्या महोत्सवात ज्येष्ठ अभिनेते जयंत सावरकर यांना 'गौरव चित्ररत्न' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. शनिवारी १४ डिसेंबरला सकाळी ११ वाजता आमदार निरंजन डावखरे व सतीश प्रधान यांच्या हस्ते या फेस्टिव्हलचे उद्‍घाटन होणार आहे.

देशभरातून आलेल्या शंभरपेक्षा जास्त लघुचित्रपटांचा या फेस्टिव्हलमध्ये समावेश असून त्यापैकी निवडक ६० लघुपटांचे स्क्रिनिंग यावेळी होणार आहे. या लघुचित्रपटांमध्ये एकापेक्षा एक प्रतिभासंपन्न कलाकाराच्या अभिनयाने नटलेल्या लघुचित्रपटाच्या मेजवानीचा आस्वाद रसिक प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे. या महोत्सवावेळी लघुचित्रपटासाठी (शॉर्ट फिल्म) फिल्ममेकर्सना विविध विभागवार ३४ बक्षीसे ठेवण्यात आलेली आहेत. फेस्टिव्हलच्या दुसऱ्या दिवशी १५ डिसेंबरला सकाळी ९.३० वा चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले असून विविध शालेय विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेतील सर्व सहभागींना प्रमाणपत्र व विजेत्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे. सायंकाळी ६.३० वाजता हा बक्षीस समारंभ होईल. यावेळी अभिनेत्री नम्रता संभेराव व उपमहापौर पल्लवी कदम उपस्थित रहाणार आहेत. तसेच यानंतर जयंत सावरकर यांना 'गौरव चित्ररत्न' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

ठाणे वैभव

१६ डिसेंबर, २०१९ **जिल्हा**

# पाचव्या माय ठाणे शॉर्ट फिल्म फेस्टिव्हलचे उद्घाटन ॲड.निरंजन डावखरे यांच्या हस्ते

**ठाणे, दि. १५ (वार्ताहर) – ब्ल्यू एंटरटेनमेंट व सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेज ठाणे यांची प्रस्तुती असलेल्या पाचव्या माय ठाणे शॉर्ट फिल्म फेस्टिवल डिसेंबर २०१९ या दोन दिवसीय फेस्टिव्हलचे उद्घाटन ॲड. निरंजन डावखरे आमदार कोकण पदवीधर मतदारसंघ यांच्या हस्ते शनिवार १४ डिसेंबर २०१९ रोजी करण्यात आले.**

देशभरातून दीडशेहून अधिक शॉर्टफिल्म ने या महोत्सवात सहभाग घेतला आहे उद्घाटनाच्या प्रसंगी सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे अध्यक्ष श्री सतीश प्रधान सचिव श्री कमलेश प्रधान खजिनदार श्री सतीश शेठ तसेच आदर्श विकास मंडळ चे अध्यक्ष श्री सचिन मोरे उपस्थित होते शॉर्ट फिल्म हे कमी वेळात सामाजिक समस्यांबाबत खूप प्रभावी भाष्य करणारे माध्यम आहे असे प्रतिपादन ॲड. निरंजन डावखरे यांनी केले तर सतिश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे अध्यक्ष श्री सतीश प्रधान यांनी शॉर्टफिल्म ही चळवळ ठाण्यातील शाळा-कॉलेजमध्ये राबवली गेली पाहिजे व त्यादृष्टीने आयोजन कसे करावे याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले उद्घाटनाच्या कार्यक्रमाला तरुण कॉलेज वर्गाने उस्फूर्त प्रतिसाद दिला.

सदर फेस्टिवलच्या दुसऱ्या दिवशी १५ डिसेंबर २०१९ रोजी सकाळी ९.३० वाजता चित्रकला स्पर्धे चे हि आयोजन करण्यात आलेले असून विविध शालेय विद्यार्थ्यांना ह्या स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळेल. या स्पर्धेतील सर्व सहभागींना प्रमाणपत्र देऊन व विजेत्यांना श्री. जगदीश थोरात, माजी वृक्षप्राधिकरण समितीचे सदस्य, ठा. म. पा. यांच्या हस्ते एकूण २५ बक्षीसे देऊन गौरवण्यात येणार आहे.

तसेच १५ डिसेंबर २०१९ रोजी संध्याकाळी ६.३० वाजता, प्रमुख पाहुणे म्हणून उपमहापौर पल्लवी कदम, अभिनेत्री नम्रता संभेराव, अभिनेत्री व इतर मान्यवर पाहुणे उपस्थित राहणार आहे.

देशभरातून आलेल्या एकूण लघुचित्रपटांपैकी निवडक ६० लघुपटाचे स्क्रिनिंग यावेळी होणार आहे. या लघुचित्रपटामध्ये एकापेक्षा एक प्रतिभासंपन्न कलाकाराच्या अभिनयाने नटलेल्या लघुचित्रपटाच्या मेजवानीचा आस्वाद रसिक प्रेक्षकांना यावेळी अनुभवता येणार आहे. या महोत्सवावेळी लघुचित्रपटासाठी (शॉर्ट फिल्म) फिल्ममेकर्सना विविध विभागवार ३४ बक्षिसे ठेवण्यात आलेली आहेत.

तसेच या प्रसंगी ज्येष्ठ अभिनेते श्री. जयंत सावरकर यांना चित्ररत्न हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. ५ वा माय ठाणे शॉर्ट फिल्म फेस्टिवल डिसेंबर २०१९, नक्कीच रंगतदार व प्रेक्षणीय होणार यात काही शंकाच नाही तरीही जास्तीत जास्त रसिक प्रेक्षकांनी सदर शॉर्ट फिल्म फेस्टिवलचा आस्वाद घेण्यासाठी यावे व www.blueentertainment.in या संकेत स्थळावर संपर्क साधावा असे आवाहन ब्लू एंटरटेनमेंटचे, पार्टनर्स तर्फे श्री. एकनाथ पवळे (९८२१७८६५४३) यांनी केले

लोकमत 17 DEC 2019

# वंचितांच्या रंगमंचावर नाट्य प्रशिक्षण देईल

## जयंत सावरकर : माय ठाणे शॉर्ट फिल्म फेस्टिव्हलमध्ये ६६ लघुपटांचे स्क्रीनिंग

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : ठाण्यात सुरु असलेला वंचितांचा रंगमंच हा कौतुकास्पद उपक्रम आहे. या रंगमंचावर मी नाट्य प्रशिक्षण देण्यास नक्कीच येईल. संपूर्ण आयुष्य पैसे कमविण्यात गेले. आता समाजाचे उतराई म्हणून हे प्रशिक्षण मी देईल, असे प्रतिपादन ज्येष्ठ रंगकर्मी जयंत सावरकर यांनी केले.

ब्ल्यू एंटरटेन्मेंट व सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय आयोजित पाचव्या माय ठाणे शॉर्ट फिल्म फेस्टिव्हलमध्ये सावरकर यांना चित्ररत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या पुरस्काराला उत्तर देताना सावरकर पुढे म्हणाले की, या फेस्टिव्हलमध्ये प्रत्येक पुरस्कारविजेता रंगमंचावर जाताना पाया पडून जात होता. याचा अर्थ हे प्रत्येकजण नाट्यवेडे आणि ध्येयवेडे आहेत. येथील उपस्थित तरुणांना पाहून मला माझे तरुणपण आठवले. आम्ही अशाच स्पर्धेत भाग घेत होतो. परंतु, आमच्यावेळी लघुपटाचा इतका प्रसार झाला नव्हता. मी स्वच्छता अभियान अणि प्रतीक्षा या दोन लघुपटांत काम केले असल्याचे ते म्हणाले. निळू फुले, दामू केंकरे, सुधा करमरकर यासारख्या थोर कलावंतांसोबत मला काम करायला मिळाले, हे माझे भाग्य असून मराठी रंगभूमीवरील एकही कलावंत नाही की, ज्यासोबत मी काम केले नाही, अशा अनेक आठवणी सावरकर यांनी यावेळी उलगडल्या.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपमहापौर पल्लवी कदम, अभिनेत्री नम्रता सुंभेराव उपस्थित होते.



ज्येष्ठ रंगकर्मी जयंत सावरकर यांना चित्ररत्न पुरस्कार प्रदान करताना.

### चित्रकला स्पर्धेत ३०० विद्यार्थ्यांचा सहभाग

महाविद्यालयाच्या पी. सावळाराम सभागृहात हा फेस्टिव्हल पार पडला. यानिमित्ताने सकाळी शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. यात जवळपास ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यावर्षी भारतातून १५० लघुपट प्राप्त झाले होते. त्यापैकी सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक मूल्यांवर प्रकाश टाकणाऱ्या ६६ लघुपटांचे स्क्रीनिंग करण्यात आले. प्लीज फरगिव्ह मी, आधा चाँद तुम रखलो, लव्हाळे, सौ. कौमारिन या लघुपटांनी फेस्टिव्हलमध्ये छाप पाडली.

ज्ञानसाधना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी.डी. मराठे, डॉ. प्रदीप ढवळ, प्रा. एकनाथ पवळे, डॉ. गणेश घुगरे तसेच तरुण संगीतकार विशाल राणे, अभिनेते विकास थोरात, डॉ. उल्हास वाघ, इतिहास अभ्यासक सदाशिव टेटविलकर आदी उपस्थित होते.

लोकमत

17 DEC 2019

**श्रीगौरी सावंत : गुरुवर्य स.वि. कुलकर्णी गौरव व्याख्यानमालेत केले मन मोकळे**

# तुमच्या टाळीत प्रेम, कौतुक आहे, तर माझ्या आक्रोश

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : माझ्या टाळीत आक्रोश आहे आणि तुमच्या टाळीत प्रेम, कौतुक आहे. या टाळ्यांची मला सवय नाही, अशा भावना श्रीगौरी सावंत यांनी प्रेक्षकांतून आलेल्या टाळ्यांना उत्तर देत व्यक्त केल्या. शिक्षक विद्यार्थ्यांना पुल्लिंग, स्त्रीलिंग आणि नपुंसकलिंग शिकवतात. पण, कधी त्यांना नपुंसकलिंगचा अर्थ समजावून सांगितला आहे का, असा सवाल त्यांनी यावेळी केला.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात झालेल्या गुरुवर्य स.वि. कुलकर्णी गौरव व्याख्यानमालेचे दुसरे आणि शेवटचे पुष्प तृतीयपंथी श्रीगौरी सावंत यांनी गुंफले. मला काही सांगायचे आहे, या विषयावर महाविद्यालयाचे प्रा.डॉ. प्रदीप ढवळ आणि प्रा. पल्लवी देशपांडे यांनी मुलाखत घेऊन त्यांना बोलते केले. त्या पुढे म्हणाल्या की, शाळेने, शिक्षणाने माझे खूप नुकसान केले. कारण, त्यांनी मला माझी ओळखच दिली नाही. आम्हाला हिजडा का म्हणतात, हे तुम्हा लोकांना सांगितले नाही आणि त्याचा त्रास सगळे तृतीयपंथी भोगत आहोत. मला समजून घेणारे कोणी नव्हते. याचा त्रास मला आणि माझ्या पालकांना होत होता. जशी वर्गात विद्यार्थी, विद्यार्थिनींना समान वागणूक दिली जाते, तशी वागणूक तृतीयपंथी विद्यार्थ्यालासुद्धा दिली पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. लैंगिकता ही स्थिर नाही. ती एका बॉक्समध्ये बसणारी नाही. ती कोणत्याही टप्प्यावर उलगडू शकते. तुम्ही काय आहात, हे जाणवते. मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. माझ्या आईवडिलांनी मला दूर केले, कारण समाजाची त्यांना भीती होती आणि म्हणूनच अशा अनेक गौरी घरापासून दूर आहेत. आम्ही समाजापासून वेगळे नाही. आम्हाला सक्षम करा. आम्हाला शाळेत सामावून घेतले असते, तर आमची ही परिस्थिती झाली नसती. स्वत:च्या जेंडरचा आपण आदर करतोय का, असा प्रश्न करीत श्रीगौरी सावंत म्हणाल्या की, आज महिला-पुरुषांचे इतके प्रश्न आहेत, त्या दोघांच्या भांडणात आम्ही तृतीयपंथी कुठे आहोत? माणसाने माणसासारखे जगावे, हीच आमची अपेक्षा आहे. समाज आम्हाला भीक मागायला लावतो. आम्हाला काम द्या. जसा मूर्तिकार मूर्तीला आकार देतो, तसा मी माझ्या शरीराला आकार दिला आहे. समाजाला आम्हाला स्वीकारायला त्रास का होत आहे, असा प्रश्नही त्यांनी केला. यावेळी महाविद्यालयाचे अध्यक्ष सतीश प्रधान, सचिव कमलेश प्रधान, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मराठे, खजिनदार सतीश सेठ आदी उपस्थित होते.



व्याख्यानमालेत उपस्थितांशी संवाद साधताना श्रीगौरी सावंत.

## मला आणखी गौरी पाहायच्या नाहीत!

किती वर्षे आम्ही टाळ्या वाजवायच्या? माझ्यासारख्या गौरी मला रस्त्यावर पाहायच्या नाहीत. जेव्हा शाळांमध्ये समान लैंगिकतेचे धडे दिले जातील, तेव्हा हे चित्र बदलेल. तुम्ही जेव्हा आम्हाला स्वीकाराल, तेव्हा तुमच्या आणि आमच्यातील दरी दूर होईल. यावेळी श्रीगौरी यांनी महाराष्ट्रात तृतीयपंथींसाठी कल्याणकारी बोर्ड असावे, अशी सरकारकडे अपेक्षा व्यक्त केली आहे. भारत सरकारकडे तृतीयपंथींच्या लोकसंख्येचा आकडाच नाही, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

आम्हाला लैंगिकतेच्या बॉक्समध्ये बसवू नका, तर आमची योग्यता ओळखून काम द्या. तृतीयपंथींना केवळ कागदावर ओळख नको; पण तुमच्या मैत्रीत एखादा हिजडाही असू द्या. आम्हाला कचरा म्हणून टाकाल, तर तो तुम्हाला भेडसावेल. पालकांनी आपले तृतीयपंथी मूल स्वीकारले तर माझ्यासारख्या अनेक गौरी सिग्नलवर दिसणार नाहीत, असेही त्या म्हणाल्या. पुढे कोणता जन्म घ्यायला आवडेल, यावर त्या म्हणाल्या, गौरीच म्हणून जन्माला यायला आवडेल.

18 DEC 2019

महाराष्ट्र टाइम्स

# झाडांच्या रक्षणासाठी दत्तक पालक

## ठाण्यातील पर्यावरणप्रेमींचा नवा उपक्रम

म. टा. प्रतिनिधी, ठाणे

शहरातील वृक्षतोड थांबविण्यासाठी ठाण्यातील पर्यावरणप्रेमींनी मानवी साखळीपासून रात्री गस्त घालण्यापर्यंत हरतऱ्हेचे उपाय केले. मात्र मेट्रोच्या कामांमुळे झाडांवर कुऱ्हाड चालविली जाण्याची धास्ती कायम असल्याने आता झाडांचे पालकत्व घेण्याचा नवा प्रयोग केला जाणार आहे. म्युज फाऊंडेशनतर्फे झाडे दत्तक घेण्याची मोहीम राबविली जात असून आतापर्यंत शहरातील १६८ विद्यार्थ्यांनी झाडांचे पालकत्व स्वीकारले असून या झाडांच्या संरक्षणाची जबाबदारी नागरिकांकडून घेतली जात आहे.

मेट्रो ४ च्या निमित्ताने ठाणेकर प्रवाशांना दिलासा मिळणार असला तरी त्यासाठी होणारी वृक्षतोड मात्र ठाणेकरांना मान्य नाही. अपरात्री एमएमआरडीने केलेल्या वृक्षतोडीबाबत नाराजी व्यक्त करणारे शहरातील नागरिक आता झाडे दत्तक घेत आहेत. ठाण्यातील म्युज संस्थेने ही मोहीम हाती घेतली असून त्याअंतर्गत आतापर्यंत शहरातील १६८ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला आहे. पालकत्व घेतल्याने प्रत्येक नागरिकाला स्वतंत्रपणे एकाच झाडाचे संरक्षण करता येईल. संबंधित परिसरातून फिरताना आपण पालकत्व घेतलेल्या झाडांची देखभाल, निगा ही जबाबदारी त्या नागरिकांवर राहणार आहे. यामुळे एकाच नागरिकावर संरक्षणाचा ताण न येता, प्रत्येक व्यक्तीला एका झाडाचे संरक्षण करणे सोपे होणार आहे. मुलुंड चेकनाका ते घोडबंदर रोड या पट्ट्यातील झाडांना मेट्रोच्या कामामुळे धोका असल्याचे सांगितले जात असल्याने या मोहिमेत या पट्ट्यातील झाडे इच्छुकांना दत्तक घेता येणार आहेत. या सर्व झाडांचे सर्वेक्षण म्युज संस्थेतर्फे करण्यात आले असून प्रत्येक झाडाला स्वतंत्र क्रमांक देण्यात आला आहे. या मोहिमेसाठी खास तयार केलेल्या ॲपद्वारे झाडांची आणि झाड दत्तक घेणाऱ्यांची सर्व माहिती नोंदविली जात आहे. झाडांच्या क्रमांकासह त्याचे पालकत्व स्वीकारल्याची माहिती संस्थेकडे असून संबंधित झाडाविषयी माहिती मिळाल्यास ॲपद्वारे माहितीची देवाणघेवाण केली जाणार आहे. या मोहिमेद्वारे झाडांवर नागरिकांचे लक्ष राहिल्याने अपरात्री नागरिकांच्या दुर्लक्षाचा फायदा घेत होणारी वृक्षतोड टाळली जाईल, असा विश्वास म्युज संस्थेच्या यश माणगावकर यांनी व्यक्त केला आहे.

### कॉलेजांमध्ये जनजागृती

युवा पर्यावरणप्रेमींना एकत्र करण्यासाठी शहरातील कॉलेजांमध्ये याची जनजागृती केली जात आहे. यानुसार बेडेकर कॉलेजातील तब्बल १०८ तरुणांनी झाडांचे पालकत्व स्वीकारले आहे. तर ज्ञानसाधना कॉलेजातील ६० विद्यार्थ्यांनी मोहिमेत सहभाग घेतला आहे.



### ऑनलाइन सहभाग

या मोहिमेसाठी संस्थेतर्फे 'ॲडॉप्ट अ ट्री' हे स्वतंत्र ॲप तयार करण्यात आले असून पालकत्व स्वीकारण्याच्या प्रक्रियेपासून ते त्याच्या संरक्षणापर्यंतची प्रत्येक चर्चा ऑनलाइन रंगणार आहे. त्यासह या मोहिमेत सहभागी होणाऱ्यांचे कौतुक करण्यासाठी प्रमाणपत्र दिले जाणार आहे. मात्र वृक्षतोड करत तयार केलेल्या कागदाचा वापर टाळण्यासाठी ई सर्टिफिकेटचा पर्याय स्वीकारला गेला असून हे प्रमाणपत्र ई मेल तसेच इतर सोशल माध्यमांवरही नोंदविता येणार आहे.

# स.प्र.ज्ञानसाधना महाविद्यालयात विद्यार्थिनींनी घेतले स्व-संरक्षणाचे धडे



**ठाणे,दि. २०(वार्ताहर)- सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी स्व-संरक्षण प्रात्याक्षिक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

अगदी अलीकडच्या हैदराबाद आणि उन्नाव येथील हृदय पिळवटून टाकणाऱ्या घटनांचे गांभीर्य लक्षात घेऊन महाविद्यालयातील 'सिव्हिल डिफेन्स व राष्ट्रीय सेवा योजना या युनिटतर्फे' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रात तरूणींवरील अत्याचाराचे वाढते प्रमाण खेदजनक आहे. आजच्या तरूण मुलींनी सक्षम होऊन खंबीरपणे अशा घटनांचा सामना करणे आवश्यक आहे, असे मत यावेळी एक्सपर्ट सिद्धेश शेळके यांनी मांडले. त्यांच्यासोबत कराटे व किक बॉक्सिंग क्षेत्रातील एक्सपर्ट सागर कुरतडकर व रूपाली हटकर यांनीही प्रात्याक्षिकांच्या साहाय्याने मुलींना स्व-संरक्षणाचे धडे दिले व सरावही करून घेतला. कार्यक्रमात प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मराठे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या नियोजनात सिव्हिल डिफेन्स प्रमुख प्रा.अतुल पाटील, रा.से.यो प्रमुख प्रा.सुरेश हलबांडगे, प्रा.महेश कुलसंगे, प्रा.किसन धादवड यांनी मोलाची भूमिका निभावली.

2 2. DEC 2019

ठाणेवैभव

# ज्ञानसाधना महाविद्यालयात वक्तृत्वाचा महायज्ञ

ठाणे, दि. २१ (वार्ताहर)- कै.ग.का.फणसे व कै.ईंदिराबाई फणसे कोकण विभागीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा ज्ञानसाधना महाविद्यालयात पार पडली. अंबरनाथमधील म.गांधी कनिष्ठ महाविद्यालयाच्या चेतना मोरे हिने कनिष्ठ महाविद्यालयीन गटात प्रथम क्रमांकाबरोबरच उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धेचेही पारितोषिक पटकावले.

तर, वरिष्ठ महाविद्यालयीन गटात महाडच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाच्या लक्ष्मण कचरे या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय व उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वाशी येथील एफ.सी.आर.आय.टी महाविद्यालयाच्या सतीश कांबळे या विद्यार्थ्याने पटकावले.

कनिष्ठ गटात म.गांधी कनिष्ठ महाविद्यालयाच्या नंदिनी ठोंबरे हिने दुसरा तर, स.प्र.ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या नतिशा रायसिंग हिने तिसरा क्रमांक पटकावला. तसेच, आस्था इंगळे(सीएचएम महाविद्यालय), प्रमोद जाधव(बांदोडकर महाविद्यालय), श्वेता श्रीमल(स.प्र.ज्ञानसाधना महाविद्यालय), चिंतामणी



जाधव(के.एम.अग्रवाल महाविद्यालय), साक्षी भोसले(के.बी.पी महाविद्यालय) आदींना उत्तेजनार्थ पारितोषिके मिळाली.

वरिष्ठ गटात प्रथमेश्वर उंबरे (जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे) याने तिसरा क्रमांक पटकावला. याशिवाय प्रज्ञा साळवी(एनजी आचार्य महाविद्याल) प्रतिक राऊत(एलफीस्टन महाविद्यालय),हर्षदा झाटे(एस. आय.सी.ई.एस महाविद्यालय) आदींना उत्तेजनार्थ पारितोषिके मिळाली. ही स्पर्धा ज्ञानसाधना संस्थेचे अध्यक्ष सतीश प्रधान, सचिव कमलेश प्रधान, खजिनदार श्री.सतीश शेठ यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडली. या वेळी प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मराठे,कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा.स्वाती नाझर,पर्यवेक्षिका प्रा.प्रज्ञा कानविंदे स्पर्धा समिती-सचिव डॉ.प्रदीप ढवळ, इ. मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेच्या नियोजनात वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्पर्धा-प्रमुख मनीषा राजपूत व डॉ.प्रज्ञा पवार तसेच,प्रा.महेश कुलसंगे, प्रा.भाग्यश्री कुडुक, प्रा.हरेश्वर भोये, इत्यादी सक्रीय सहभागी होते.

या स्पर्धेत वरिष्ठ व कनिष्ठ गटातील एकूण ५४ विद्यार्थी सहभागी झाले होते. वरिष्ठ गटासाठी उन्मेश बागवे आणि वंदनाताई शिंदे यांनी तर,कनिष्ठ गटासाठी प्रा.भास्कर मयेकर आणि प्रा.जयश्री राजपूत यांनी परिक्षण केले.

ठाणेवैभव

2 3 DEC 2019

# स.प्र.ज्ञानसाधनात व्यावसायाभिमुख शिक्षण



ठाणे,दि.२२(वार्ताहर)- सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात स्टुडंट ॲक्टीव्हीटी सेंटर (**SAC**) अंतर्गत वर्षभर विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच विविध कौशल्यगुण विकास प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात येते. यंदाही विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा व मानसिक समाधानाबरोबरच गरज पडल्यास व्यावसायाच्या विविध संधी उपलब्ध करून द्याव्यात या हेतूने गोंड पेंटींग, ग्लास पेंटींग, हस्तकलेच्या विविध वस्तू, राख्या तसेच चटपटा चाट, आवळा सरबत यांसारख्या विविध वस्तू व खाद्यपदार्थ बनविण्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले.

या उपक्रमांच्या नियोजनात स्टुडंट ॲक्टिव्हीटी सेंटर प्रमुख प्रा.अर्चना टिपणीस, प्रा.इशिता सेनगुप्ता, प्रा.भाग्यश्री कुडुक, प्रा.अनिता जोगळेकर, प्रा.पल्लवी देशपांडे यांनी मोलाची भूमिका निभावली.

या विविध प्रशिक्षण शिबिरांमध्ये विद्यार्थ्यांनी स्वहस्ते बनविलेल्या वस्तू विविध खाद्यपदार्थ, आवळा सरबत यांसारखे खाद्यपदार्थ व वस्तुंच्या प्रदर्शन व विक्रीचे आयोजन **SAC** तर्फे १६ डिसेंबर रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे सचिव कमलेश प्रधान, प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मराठे, उपप्राचार्या प्रा.स्वाती नाझर, पर्यवेक्षिका प्रा.प्रज्ञा कानविंदे आवर्जून उपस्थित होते.

लोकसत्ता 25 DEC 2019

शाळा-महाविद्यालयात तरुण दिग्दर्शकांना मागणी

# नृत्य, संगीत दिग्दर्शकांसाठी वार्षिक स्नेहसंमेलनांचा हंगाम सुगीचा

गीता कुळकर्णी, ठाणे

**ठाण्यातील शाळा** आणि महाविद्यालयांमध्ये सध्या वार्षिक स्नेहसंमेलनांचा हंगाम सुरू आहे. विविध आंतरशालेय, आंतरमहाविद्यालयीन नृत्य आणि संगीत महोत्सवांच्या स्पर्धांचे आयोजनाचे प्रमाणही वाढले आहे. यामध्ये चमकदार कामगिरी करण्यासाठी शाळा आणि महाविद्यालय व्यवस्थापनाकडून प्रशिक्षित दिग्दर्शकांना मोठ्या प्रमाणावर पाचारण करण्यात येत आहे. त्यामुळे एकीकडे कला जोपासताना दुसरीकडे होतकरू तरुणांना अर्थाजनही होत आहे.

शाळा आणि महाविद्यालयात होणाऱ्या वार्षिक स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्यातील कलागुणांना वाव देण्यास मदत होते. पूर्वी विद्यार्थी सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी स्वतः नृत्य बसवायचे किंवा शाळा तसेच महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांना बोलावून त्यांच्यातर्फे नृत्यदिग्दर्शन होत होते. वार्षिक स्नेहसंमेलनातील सांस्कृतिक कार्यक्रमांकरिता तसेच सध्या मोठ्या प्रमाणावर आंतरशालेय आणि आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन होत आहे. या स्पर्धांमध्ये यश मिळवून शाळेचे नाव प्रसिद्ध होण्याकरिता शाळा आणि महाविद्यालय प्रशासन हे प्रशिक्षित दिग्दर्शकांना पाचारण करत आहेत. ठाणे शहरातील विविध शाळा तसेच महाविद्यालयात ही संकल्पना राबवण्यात येत आहे.

वार्षिक स्नेहसंमेलन तसेच इतर स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना नृत्य आणि संगीत शिकवण्याकरिता येणारे कलाकार. हे प्रशिक्षित असतात. त्यामुळे कमी वयातच विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळाल्याने त्यांना एक करिअरची दिशाही या निमित्ताने मिळत असल्याचे शाळांमधील शिक्षकांकडून सांगण्यात आले.

एका गाण्यासाठी नृत्यदिग्दर्शक शाळेकडून प्रति विद्यार्थी २०० ते १००० रुपये आकारतात. तसेच नृत्यासाठी लागणारे साहित्य आणि पोशाख उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ही नृत्यदिग्दर्शकावरच असते.

ठाण्यातील रा.ज. ठाकूर शाळा, थिराणी विद्यालय, शिवाई विद्यालय, महाराष्ट्र विद्यालय आणि ज्ञानसाधना महाविद्यालय या शाळा आणि महाविद्यालयांमध्ये दरवर्षी नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी महिन्यात नृत्यदिग्दर्शनासाठी जात असल्याचे नृत्यदिग्दर्शक पंकज पडाळे यांनी सांगितले.



**पूर्वीच्या काळी स्पर्धेचे प्रमाण कमी असल्यामुळे विद्यार्थी स्वतः सादरीकरणाची तालीम करत किंवा माजी विद्यार्थ्यांना बोलावून त्यांच्यातर्फे नृत्य तसेच संगीताची तयारी करत. आता स्पर्धा वाढली असून विद्यार्थ्यांनाही त्या कलेचा सखोल अभ्यास करण्याची इच्छा निर्माण होऊ लागली आहे. यामुळे पारंगत नृत्यदिग्दर्शक तसेच संगीतदिग्दर्शकांना मानधनावर बोलावून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन देणे सोयीस्कर झालेले आहे.**

- प्रा. अंजली देशपांडे, सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे

## संगीत दिग्दर्शकांनाही मागणी

**गायनासाठीही संगीत दिग्दर्शकांची शाळा-महाविद्यालये हंगामी नेमणूक करत आहेत. हे संगीत दिग्दर्शक विद्यार्थ्यांना गायनाबरोबर विविध वाद्य वाजवण्याचेही प्रशिक्षण देत आहेत. संगीत दिग्दर्शनासोबत स्नेहसंमेलनावेळी शाळा-महाविद्यालयांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांदरम्यान इतर आवश्यक साहित्याची पूर्तता करण्यासाठी ३० हजार ते ४० हजार रुपये इतकी शाळा-महाविद्यालय प्रशासनाकडून आकारणी करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना कलेचे मार्गदर्शन करताना पुढील पिढी घडवत असल्याचे समाधान मिळते आणि तसेच अर्थाजनही होत असल्याचे संगीत दिग्दर्शक समीर दळवी यांनी सांगितले.**

लोकमत

23 JAN 2020

ठाण्यात भरले प्रदर्शन : कार्यशाळेत ७८ विद्यार्थ्यांचा सहभाग

# नाण्यांद्वारे विद्यार्थ्यांनी जाणून घेतला इतिहास

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जाणून घ्या तुमचा इतिहास- नाण्यांद्वारे, या विषयावर आयोजित कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी आपला इतिहास नाण्यांद्वारे जाणून घेतला. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना प्राचीन ते आधुनिक नाण्यांचे प्रदर्शन अनुभवण्याची संधी मिळाली.



आहत नाणी, मौर्य, सातवाहन, नहापण, कुशाण, दिल्ली सुलतान शाही, मराठा, गझनी काळातील तसेच नाझी जर्मनी, ब्रिटिश, डच, पोर्तुगीज आणि स्वतंत्र भारत या काळातील नाणी प्रदर्शनात ठेवली होती.

महाविद्यालयाचा इतिहास विभाग आणि हिंदुजा फाउंडेशन व भारतीय नानकशास्त्र, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संशोधन संस्था, नाशिक (आयएनएचसीआरएफ) यांच्या संयुक्त विद्यमाने ही एकदिवसीय कार्यशाळा सोमवारी आयोजिली होती. तिला मार्गदर्शन प्रसिद्ध तज्ज्ञ अमितेश्वर झा, डायरेक्टर संशोधन विभाग (आयएनएचसीआरएफ) यांनी केले. कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मराठे यांनी केले. ७८ विद्यार्थी तीत सहभागी झाले. यासोबत एकदिवसीय प्राचीन ते आधुनिक नाण्यांचे प्रदर्शन जनकवी पी. सावळाराम येथे भरविण्यात आले होते. या प्रदर्शनासाठी संस्थेचे सचिव कमलेश प्रधान, खजिनदार सतीश सेठ व मराठे आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी भेट दिली.

कार्यक्र माचे सूत्रसंचालन प्रा. रूपाली मुळ्ये यांनी केले, तर नियोजन प्रा. बाबासाहेब कांबळे आणि डॉ. सीमा केतकर यांनी केले. तसेच, यानिमित्ताने आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा झाली. निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक मानसी मोरे, द्वितीय क्रमांक धनश्री साळसकर आणि तृतीय क्रमांक वैष्णवी वासाळकर. पोस्टर स्पर्धेत प्रथम क्रमांक शिवानी साळवी, द्वितीय क्रमांक निखिल जाधव, तर तृतीय क्रमांक ऋषिकेश घाडी यांनी पटकावले.

२९/०१/२०२०
पुण्य नगरी

# दिल्लीत ज्ञानसाधना महाविद्यालयाचा फडकला झेंडा

## राज्यातल्या १४ मुलामुलींच्या चमूसमवेत मल्लखांब सादरीकरण

**प्रज्ञा सोपारकर**

**ठाणे** : प्रजासत्ताक दिनानिमित्त मंगळवारी सकाळी दिल्लीत झालेल्या पी. एम. रॅलीत ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचा झेंडा फडकला. एनसीसी कॅडेटच्या प्राजक्ता शेबेकर, महेश्वरी म्हात्रे यांनी यात सहभाग घेतला. महाराष्ट्र गर्ल्स बटालियन एनसीसी, मुंबई बी ग्रुप बटालियनच्या अंतर्गत दोघी सहभागी झाल्या. महाराष्ट्र डायरेक्ट ट्रीट परफॉर्मन्समध्ये राज्यातल्या अन्य १४ मुलामुलींच्या चमूसमवेत मल्लखांबचे सादरीकरण केले.

ज्ञानसाधना महाविद्यालयात एनसी सी गर्ल्स युनिट २००७ पासून असोसिएट एनसीसी ऑफिसर लेफ्टनंट राधिका चिरीवेल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. आजवर महाविद्यालयाच्या १३ विद्यार्थ्यांना पी. एम. रॅली, राजपथ, ऑल इंडिया थलसैनिक जाण्याची संधी युनिटच्या माध्यमातून मिळाली. रविवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त राजपथावर विविध प्रात्यक्षिकांसह संचलन झाले. तर पीएम रॅली २०२० चे आयोजन गॅरिसेन ग्राउंड, दिल्ली कॅन्टोन्मेंट येथे करण्यात आले.



रॅलीसाठी यंदा महाराष्ट्र डायरेक्ट ट्रीट परफॉर्मन्सअंतर्गत मल्लखांबची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. त्यासाठी संपूर्ण राज्यातून ७ मुले आणि ७ मुलींचा समावेश होता. त्यामध्ये ज्ञानसाधनाच्या २ एनसीसी कॅडेट्स मुलींचा समावेश होता. मल्लखांबचे कोणतेही तांत्रिक शिक्षण नसताना या टीमने कॅडेट्स बोरिवली आणि कुलाबा येथे झालेल्या सराव शिबिरात मल्लखांब शिकल्या. याचा मला खूप आनंद झाल्याचे ए. एन. ओ लेफ्टनंट राधिका चिरीवेल्हा यांनी दै. पुण्यनगरीशी बोलताना सांगितले. तसेच महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे अध्यक्ष सतीश प्रधान, सचिव कमलेश प्रधान, महाविद्यालयाचे प्राचार्य, अन्य सहकाऱ्यांचा पाठिंबा कायम मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

> “ संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून ज्ञानसाधना महाविद्यालयातील दोन कॅडेट्सचा समावेश पीएम रॅलीसाठी झाला.
>
> – **कमलेश प्रधान**, सचिव, सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय

२९/०९/२०२०
पुण्य नगरी

## कादंबरीच्या पुरस्कारासाठी 'बदल'ची निवड

# कोमसापचे वाङ्मयीन व वाङ्मयेतर पुरस्कार जाहीर

**मुंबई** : कोकण मराठी साहित्य परिषदेचे २०१८-१९ चे वाङ्मयीन व वाङ्मयेतर पुरस्कार मंगळवारी जाहीर करण्यात आले. पुरस्कार समितीचे नियंत्रक व केंद्रीय अध्यक्ष प्रा.अशोक ठाकूर यांनी पुरस्कारांची घोषणा केली. कोमसापतर्फे लवकरच घोषित झालेल्या पुरस्कारांची वितरण तारीख व स्थळ जाहीर करण्यात येईल. कादंबरी, कथासंग्रह, कविता, चरित्र-आत्मचरित्र, समीक्षा, ललितगद्य, बालवड्यम, नाटक-एकांकिका आणि इतर साहित्य प्रकारांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

कादंबरीचा र. वा. दिघे स्मृती प्रथम क्रमांकाचा पुरस्कार डॉ. गिरीश जखोटी यांच्या 'बदल' या कांदरबरीला, कथासंग्रहाचा वि. सी .गुर्जर स्मृती प्रथम क्रमांकाचा पुरस्कार विकास गावडे यांच्या 'तारेवारच्या कसरतीला', कविता वाङमय प्रकाराचा आरती प्रभू स्मृती प्रथम क्रमांकाचा पुरस्कार डॉ. घनश्याम बोरकर यांच्या 'खेळीया' या कवितासंग्रहाला, चरित्र-आत्मचरित्रासाठीचा धनंजय कीर स्मृती प्रथक क्रमांकाचा पुरस्कार एम.पी. तथा मधु पाटील यांच्या 'खार जमिनीतील रोप' या साहित्यकृतीला देण्यात आला आहे. ललित गद्यासाठीचा अनंत काणेकर स्मृती प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्रतिभा सरफा यांच्या 'सहज संवाद' या पुस्तकाला जाहीर झाला आहे. याशिवाय कोमसापचा विशेष पुरस्कार यवशंत कदम यांच्या 'गडगीचा डोह' या कथासंग्रहास देण्यात येत आहे. तसेच कोमसापचा विशेष पुरस्कार उषा परब यांच्या 'कुसवा' या कांदबरीस मिळाला आहे.

**वाङ्मयेतर पुरस्कारांमध्ये कविता राजधानी पुरस्कार – प्रज्ञा दया पवार यांना, कै. पद्मश्री भाऊसाहेब वर्तक प्रतिष्ठान पुरस्कार– डॉ. देवराज हिराजी पाटील यांना, श्री. बा. कारखानीस पुरस्कार – डॉ. उदयकुमार पाध्ये यांना, गुरुवर्य अ. आ. देसाई स्मृती कोमसाप कार्यकर्ते पुरस्कार–सूर्यकांत मालुसरे यांना जाहीर झाला आहे.**

जनादेश

शनिवार ११ जानेवारी २०२०

# माझे ठाणे, प्रिय ठाणे



ज्ञानसाधना महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनात ठाणे शहराचे अनोखे दर्शन घडवणाऱ्या पुठ्ठ्याच्या कलाकृतीचे कौतुक होत आहे. याच महाविद्यालयाचे कर्मचारी मंगेश खराटकर यांनी ही कलाकृती साकारली आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य चंद्रशेखर मराठे, ग्रंथपाल डॉ. महेश दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कलाकृती घडवण्यात आली आहे.

फोकस

दि. २०/०२/२०२०
सामना

# ठाण्यातील विद्यार्थ्यांना व्यवसायाचे धडे

## ज्ञानसाधना महाविद्यालयाचा पुढाकार



ठाणे, दि. १९ (प्रतिनिधी) - भविष्यात यशस्वी उद्योजक घडावेत म्हणून ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना या कनिष्ठ महाविद्यालयातील २०० विद्यार्थ्यांची आज आगळीवेगळी 'शाळा' घेण्यात आली. उत्पादन, लेखा, गोदाम, सांडपाणी प्रक्रिया तसेच खतनिर्मिती विभागासंदर्भात या विद्यार्थ्यांना माहिती देतानाच व्यवसायाचे धडे देण्यात आले. त्यासाठी खास ठाण्यातील प्रसिद्ध 'प्रशांत कॉर्नर'च्या कारखान्याला भेट देण्यात आली.

विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्र अधिक बारकाईने अभ्यासता यावे, त्यातील व्यवस्थापनाच्या विविध विभागांची माहिती मिळावी, उद्योगधंद्याविषयी आवड निर्माण व्हावी व भविष्यातील यशस्वी उद्योजक घडावेत हा हेतू या उपक्रमामागे होता. या औद्योगिक क्षेत्र भेटीचे आयोजन पर्यवेक्षिका प्रा. प्रज्ञा कानविंदे यांनी केले तर संयोजनात कॉमर्स असोसिएशनचे प्रमुख प्रा. राजेंद्र वेखंडे, वाणिज्यचे प्रा. दत्तात्रय चितळे, कला विभागाचे प्रा. सुनीता जमणे, कलामंचचे प्रा. विद्या चव्हाण यांनी मोलाची भूमिका निभावली. या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष सतीश प्रधान, सचिव कमलेश प्रधान, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मराठे, उपप्राचार्या प्रा. स्वाती नाझर यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना भेट देण्यात आलेल्या पुस्तिकेच्या माध्यमातून त्यांना उद्योजक प्रशांत सकपाळ यांचा असामान्य प्रेरणादायी प्रवास जवळून पाहता आला.

दिनांक : २०/०२/२०२०
लोकसत्ता

# ‘ज्ञानसाधना गीत २०२०’

**ठाण्यातील सतीश** प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात चित्रपट, दूरचित्रवाणी आणि नवे माध्यम या विभागातर्फे ‘ज्ञानसाधना गीत २०२०’ ची निर्मिती करण्यात आली आहे. हे गीत प्रदर्शित करण्यासाठी नुकतेच एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मराठे यांच्या हस्ते प्रदर्शित करण्यात आले.

या महाविद्याच्या चित्रपट, दूरचित्रवाणी आणि नवे माध्यम या विभागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात गीत ध्वनी मुद्रण करण्याचा अनुभव मिळावा यासाठी दरवर्षी महाविद्यालयाच्या गीताची निर्मिती करण्यात येते. यंदाही चित्रपट, दूरचित्रवाणी आणि नवे माध्यम या विभागातर्फे ‘ज्ञानसाधना गीत २०२०’ ची निर्मिती करण्यात आली आहे. या गाण्याचे ध्वनी मुद्रण महाविद्यालयाच्या ध्वनी मुद्रण खोलीत करण्यात आले आहे. महाविद्यालयाचे प्राध्यापक ऋग्वेद देशपांडे यांनी हे गाणे लिहिले आणि संगीतबद्ध केले आहे. गायक मंगेश बोरगावकर यांच्या स्वरात हे गीत ध्वनी मुद्रित करण्यात आले आहे. तर, या गीताचे चित्रीकरणदेखील चित्रपट, दूरचित्रवाणी आणि नवे माध्यम या विभागाच्या विद्यार्थ्यांनी केले आहे. या गीताच्या प्रदर्शनानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रातील विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे भालचंद्रसिंह रावराणे आणि महाविद्यालयाचे अध्यक्ष सतीश प्रधान, सचिव कमलेश प्रधान, खजिनदार सतीश शेठ हे उपस्थित होते.




**मुलुंड येथील केळकर एज्युकेशन ट्रस्ट संचालित वि. ग. वझे महाविद्यालयाला मुंबई विद्यापीठाकडून स्वायत्ता मिळाली आहे. यानिमित्ताने महाविद्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. बी. शर्मा यांनी यावेळी महाविद्यालयाने विविध स्थरावर राबविलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. तर, संस्थेचे सचिव एम. आर. कुरूप यांनी महाविद्यालयाचा स्वायत्त मिळविण्यापर्यंतचा प्रवास आणि भविष्यातील आव्हान याविषयी उपस्थितांना सांगितले.**

लोकसत्ता

2 3 JAN 2020

४ WWW.LOKSATTA.COM
गुरुवार, २३ जानेवारी २०२०

कॉलेजच्या कट्ट्यावर

संकलन - पूर्वा साडविलकर

# ज्ञानसाधना महाविद्यालयात युथोपियाची धूम

**ठाण्यातील सतीश** प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील युथोपिया या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात विविध स्पर्धा, तसेच कार्यक्रम घेण्यात आले होते.

या महोत्सवात चेहरा रंगवणे, टॅटू काढणे, मेकअप, मेहंदी, नखांवर नक्षीकाम करणे, टी-शर्ट, मातीचे मडके रंगवणे यासह छायाचित्रण, लघू चित्रपट आणि रांगोळी काढणे या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला होता. त्याचबरोबर गायन, फॅशन शो आणि नृत्य या स्पर्धांमध्येदेखील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट पद्धतीने सादरीकरण केले. हा सहादिवसीय महोत्सव




महाविद्यालयातील प्राध्यापक अंजली देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मराठे यांनी विद्यार्थ्यांच्या कलांचे कौतुक केले.

दै. सकाळ दिनांक १४ मार्च २०२०

# 'पारंगत' एकांकिका स्पर्धेत ठाणे, मुंबई प्रथम

## खुल्या गटातून 'अ बास्टर्ड पॅट्रिऑट' विजयी

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. १३ : एकांकिका क्षेत्रात मानाच्या समजल्या जाणाऱ्या 'अस्तित्व' आयोजित पारंगत एकांकिका स्पर्धेमध्ये ठाण्याच्या दिशा थिएटरची 'अ बास्टर्ड पॅट्रिऑट' या एकांकिकेने खुल्या गटात; तर मुंबईच्या महर्षी दयानंद महाविद्यालयाच्या 'ब्रह्मास्त्र' या एकांकिकेने आंतरमहाविद्यालयीन गटात प्रथम पारितोषिकाचा मान मिळवला. रंगयात्रा, इचलकरंजीच्या 'मोठा पाऊस आला आणि...' आणि मुलुंड वाणिज्य महाविद्यालयाच्या 'भाग धन्नो भाग' या एकांकिकेला अनुक्रमे विशेष परीक्षक सन्मान आणि लक्षवेधी नैपुण्य या पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

'अ बास्टर्ड पॅट्रिऑट साठी संकेत पाटील व राजरत्न भोजने; तर 'ब्रह्मास्त्र'साठी रोहित मोहिते व रोहित कोतेकर सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक ठरले. गायन समाज देवल क्लब, कोल्हापूरच्या 'इट हॅपन्स' या एकांकिकेसाठी अनुपम दाभाडे याला पारंगत दिग्दर्शक म्हणून खुल्या गटासाठी विशेष परीक्षक तसेच 'भोकरवाडीचा शड्डू' एकांकिकेसाठी महाविद्यालय गटात ज्ञानसाधना, ठाण्याच्या अजय पाटील याला पारंगत दिग्दर्शक मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

'पारंगत सन्मान-२०२०' पुरस्कार सोहळा नुकताच पु. ल. देशपांडे कला अकादमीत पार पडला.

खुल्या गटात 'इट हॅपन्स'च्या भूमिकेसाठी प्रमोद पुजारी आणि महाविद्यालयीन गटात कीर्ती महाविद्यालय, मुंबईच्या 'ठसका'साठी धीरज कांबळे सर्वोत्कृष्ट अभिनेता ठरले. महाविद्यालयीन गटात 'ब्रह्मास्त्र'साठी रोहन सुर्वेला लक्षवेधी अभिनय नैपुण्य आणि 'भाग धन्नो भाग'साठी सागर शिंदेला अभिनयाचे मानपत्र देण्यात आले.

खुल्या गटात अभिनयासाठी 'अ बास्टर्ड पॅट्रिऑट'साठी राजरत्न भोजनेला विशेष परीक्षक सन्मान मिळाला. वर्षभरात सातत्यपूर्ण कामगिरी केल्याबद्दल, महाविद्यालयीन गटात 'ब्रह्मास्त्र'च्या कोमल वंजारेला आणि खुल्या गटात 'अ बास्टर्ड पॅट्रिऑट'मधल्या सिमरन सैद आणि 'मोठा पाऊस आला आणि..' एकांकिकेतल्या कादंबरी माळीला विशेष मानपत्र देण्यात आले. विषयाच्या नावीन्याबद्दल 'आर यू ब्लाइंड'साठी विशाल कदम; तर 'ठसका'साठी चैतन्य सरदेशपांडे पारंगत लेखक ठरले.

लोकसत्ता
19 MAR 2020

# ज्ञानसाधना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना उद्योगाचे धडे



**ठाण्यातील सतीश** प्रधान ज्ञानसाधना कनिष्ठ महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या भेटीअंतर्गत विद्यार्थ्यांनी प्रशांत कॉर्नरच्या अद्ययावत कारखान्याला भेट दिली. विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्राचे ज्ञान मिळावे, व्यवस्थापनाच्या विविध विषयांची माहिती मिळावी तसेच उद्योगांविषयी आवड निर्माण व्हावी या उद्देशाने या कारखान्याला भेट देण्यात आल्याचे महाविद्यालयातील प्राध्यापकांनी दिली.

या औद्योगिक भेटीअंतर्गत विद्यार्थ्यांना उत्पादन विभाग, लेखा विभाग, गोदाम, सांडपाणी प्रक्रिया विभाग, खतनिर्मिती विभागांचा कामकाज दाखविण्यात आला होता. यावेळी मिठाई तयार करण्याची प्रक्रियेविषयी तसेच विविध मिठाईंविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. ही औद्योगिक भेट महाविद्यालय संस्थेचे अध्यक्ष सतीश प्रधान, सचिव कमलेश प्रधान, प्राचार्य चंद्रशेखर मराठे तसेच पर्यवेक्षिका प्रज्ञा कानविंदे, वाणिज्य शाखा प्रमुख दत्तात्रय चितळे, कला शाखा प्रमुख सुनीता जमणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.